महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांकः असप्र-१२१६/प्र.क्र.१९३/२०१६/चौदा
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १४ /०८/२०१९

संदर्भ :- सा.प्र.वि. आदेश क्र.असप्र-१२१६/प्र.क्र.१९३/चौदा, दि.०९.०८.२०१६, दि.०७/०८/२०१७, दि.२७/०८/२०१८ व दि.२८/०३/२०१९

आदेश

श्री. वि.शे.बोंदरे, अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग यांची या विभागाच्या संदर्भाधीन दि.०९.०८.२०१६ च्या आदेशान्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं.लि. (महानिर्मिती) या कार्यालयातील " कार्यकारी संचालक (मा.सं.) " या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधिन दि.०७.०८.२०१७ व दि.२७.०८.२०१८ च्या आदेशान्वये सदर प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान संदर्भाधिन दि.२८/०३/२०१९ च्या आदेशान्वये श्री.वि.शे.बोंदरे, अवर सचिव यांच्या सेवा प्रत्यावर्तीत करण्यात येऊन त्यांची प्रतिनियुक्तीवरुन प्रत्यावर्तनानंतरची पदस्थापना कृषी व पदुम विभागात अवर सचिव या पदावर करण्यात आली. तथापि, महाव्यवस्थापक (मासं), महानिर्मिती, माटूंगा, मुंबई यांनी त्यांच्या दि.२१/०२/२०१९ च्या श्री.बोंदरे, अवर सचिव यांच्या कार्यमुक्ती आदेशास स्थगिती दिली असून श्री.बोंदरे यांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही असे कळविले आहे.

२. आता महानिर्मिती कार्यालयाने त्यांच्या दि.०१/०८/२०१९ च्या पत्रान्वये श्री.बोंदरे, अवर सचिव यांना दि.०७/८/२०१९ रोजी कार्यमुक्त करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने श्री.विनोद शेषराव बोंदरे, अवर सचिव यांचे संदर्भाधिन दि.२८/०३/२०१९ चे प्रतिनियुक्तीवरील प्रत्यावर्तनाचे आदेश रद्द करुन या आदेशान्वये, श्री. बोंदरे यांची प्रतिनियुक्तीवरुन प्रत्यावर्तनानंतरची सुधारीत पदस्थापना कौशल्य विकास व उद्योजकता विभागात करण्यात येत आहे. या आदेशानुसार श्री.वि.शे.बोंदरे, अवर सचिव यांनी कौशल्य विकास व उद्योजकता विभागात रुजू व्हावे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१४१८२८५१५००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.14 18:34:02 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. अ.मु.स.(सेवा),सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
४. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, महिला व बाल विकास विभाग / उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग / कृषी व पदुम विभाग / कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय,मुंबई

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादीत, प्रकाशगड, वांद्रे(पूर्व), मुंबई,
६. सह/उप सचिव (आस्थापना), महिला व बाल विकास विभाग / उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग / कृषी व पदुम विभाग / कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
७. श्री. वि.शे.बोंदरे, अवर सचिव, कार्यकारी संचालक (मा.सं.), महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं.लि. (महानिर्मिती), प्रकाशगड, वांद्रे(पूर्व), मुंबई
८. निवडनस्ती कार्यासन-१४